# लोणारवाडीत फुलले शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न !

## देवनदीचे केले पुनरुज्जीवन; बियाणे, खतांसाठी उभा केला स्वतःचा ‘मॉल’

विधायक

नीश जोशी : सकाळ वृत्तसेवा

लोणारवाडी, (ता. सिन्नर) ता. ७ : “खेड्यातील मंदिरं वर्षानुवर्षे टिकतात, तर ती शेतकऱ्यांनी धलेली असतात. शाळा का पडतात, रण त्या सरकारनं बांधलेल्या सतात,” लोणारवाडीच्या ‘युवामित्र’ थेचे प्रमुख सुनील पोटे यांनी नसुधारणेचं तत्त्वच सांगितलं.

गावकऱ्यांना साथीला घेऊन णारवाडी आणि पंचक्रोशीतील वीस गावांना जीवनदायिनी ठरलेल्या नदीचं पुनरुज्जीवन युवामित्रनं केलं. ी असून कोरडवाहू शेती करणाऱ्या तकऱ्यांना स्वतःच्या उन्नतीसाठी माला लावून त्यांचं हिरवं स्वप्न श्री. ट यांनी फुलवलं आहे.

लोणारवाडी हे नाशिक जिल्ह्यातील न्नरपासून दहा किलोमीटर परिसरातील त्र. या गावासह आशापूर, ढेवाडी, भाटवडे, वडगावसह १ गावांना वळसा घालून जाणारी नदी पंधरा वर्षांपूर्वी कोरडी होती, र्क्षित होती. सुनील पोटे सांगत होते, ी एमएसडब्ल्यूची पदवी घेतली. त्राकडं आलो. गावातले अनेक ण माझ्यासारखंच पदवी वगैरे घेऊन ठल्या ना कुठल्या कंपनीत नशीब जमावण्यासाठी निघालेले. त्यांच्या र-पाच एकरापासून वीस-पंचवीस करांपर्यंत जमिनी होत्या. तरीही ी परवडत नाही म्हणून ते जगायला त्राबाहेर पडलेले. नाशिक, मुंबईत कऱ्या करून मी गावाकडं आलो. णांना एकत्र करून युवामित्रचं काम ू केलं.”

लोणारवाडी परिसरातील ाजवळ ब्रिटिशकालीन पाट सल्याचे युवामित्रच्या लक्षात आले. पाट कुठे जातात याचा शोध त्यांनी तकऱ्यांच्या साथीनं घेतला तेव्हा, देवनदीशी ते निगडित असल्याचं लक्षात आलं. हे पाट आणि नदी झाड-झाडोऱ्यांनी भरलेली. गाळ आणि गचपानामुळं पाणी वाहत नव्हतं. त्या त्या गावच्या गावकऱ्यांना साथीला घेऊन युवामित्रनं श्रमदानानं देवनदी स्वच्छ केली. पावसाळा आला आणि नदी पाण्यानं भरून गेली. प्रवाह वाहता झाला. त्यानं आसपासच्या विहिरी तुडुंब भरल्या. बोअरचं पाणी वाढलं. हिरवं स्वप्न साकारण्याच्या दिशेनं वाटचाल सुरू झाली.




लोणारवाडीतील युवामित्रचा कृषीविषयक मॉल



सुनील पोटे



मी कंपनीतील नोकरी सोडून मॉलचं व्यवस्थापन करीत आहे. जोडीला माझी शेती आहे. युवामित्रमुळं मी गावाकडं परत येऊन सुखासमाधानाचं जीवन जगत आहे.
**–अनिल शिंदे**, व्यवस्थापक,
देवनदी व्हॅली ॲग्रि. प्रोड्युसर्स लि.



सहा एकर शेती असून माझी अडचण होत असे. आता युवामित्रमुळं भाजीपाल्याची लाइन सापडली आहे. पंजाबमध्ये मी कांदा पाठवला.
**अण्णा नारायण कोटकर,**
शेतकरी, वडगाव



शेतकऱ्यांना शिक्षणापेक्षा प्रशिक्षणाची गरज आहे. त्यांच्यासाठी आगामी काळात ‘सप्लाय चेन’ करणार आहोत. शेती फायद्याची आहे, हे त्यातून सिद्ध होईल.
**–सोमदत्त लाड,**
उपाध्यक्ष, युवामित्र

### अशी झाली किमया

- » साठ तरुण कंपनीतील नोकरी सोडून गावाकडं शेतीसाठी परतले.
- » नाबार्डची मदत असलेला पहिला ॲग्रिकल्चर मॉल
- » वार्षिक उलाढाल शून्यातून पोचली दोन कोटी रुपयांवर
- » विदर्भातील शेतकरीही पाहणीसाठी आले लोणारवाडीत

### पाच गुंठ्यांचा प्रयोग

“नदीला पाणी आल्यामुळं गावकऱ्यांचा उत्साह वाढला, पण पिकं आणि उत्पादनाचं काय”, पोटे सांगत होते, “ मग आम्ही पाच गुंठ्यांचा प्रयोग केला. शेतकऱ्यांना रोज उत्पन्न मिळालं पाहिजे, हा आमचा हेतू होता. दोन किंवा तीन एकर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना वांगे, मेथी, ब्रोकोली, भोपळा, मिरची असा भाजीपाला एकेक गुंठा विशिष्ट दिवसांनी लावायला सांगितला. जेणेकरून उत्पादन सुरू झाल्यानंतर रोज एक भाजी बाजारात जाईल, याची खात्री होती. त्यातून रोज किमान ५०० रुपये उत्पन्न सुरू झालं. बाजारात शेतकरी स्वतः जाऊ लागल्यानं बाजार काय आहे हे त्याला कळालं. पाच गुंठेच रान करायचं असल्यानं मजुराची गरज नव्हती. माल स्वतः उचलून तो बाजारात जाऊ शकत होता. या भागातल्या अनेक शेतकऱ्यांनी हे सुरू केलं आणि मग मुंबईच्या ‘स्टार इंडिया’ टाटांच्या मॉलला लोणारवाडीचा माल जाऊ लागला.”

### देवनदी व्हॅली ॲग्रिकल्चर प्रोड्युसर्स लि.

शेतीला पाणी झाले, उत्पादन वाढलं पण बियाणे आणि खतांमध्ये शेतकऱ्यांची अडवणूक होऊ लागली. त्यासाठी युवामित्रनं पुढाकार घेतला जैन ठिबक, टाटा आणि खतांच्या कंपनी मालकांशी संपर्क करून वाजवी भावात किटकनाशके, खते, बियाणे घेण्यासाठी देवनदी व्हॅली ॲग्रिकल्चर प्रोड्युसर्स लिमिटेड संस्था स्थापन केली. या कंपनीचा स्वतःचा मॉल थाटला. आता कोणतीही फसवणूक न होता खात्रीचं बियाणं, खात्रीशीर खते, किटकनाशके वगैरे उपलब्ध होऊ लागलं. त्यानं शेतकऱ्यांची बरकत वाढली.

### माती परीक्षण प्रयोगशाळा

उत्पादन वाढावं म्हणून शेतकरी भरमसाट रासायनिक खते वापरतात. ही त्यांची सवय लक्षात घेऊन युवामित्रनं स्वतःची माती परीक्षण प्रयोगशाळा काढली. पंचवीस गावच्या सर्व शेतकऱ्यांच्या जमिनीचा पोत, त्यांच्या मातीची गुणवत्ता लक्षात घेऊन कोणते पीक घ्यायचे, त्यासाठी खताची मात्रा किती द्यायची, याचं गणित ठरवण्यात आलं. त्याचा फायदा होऊन रासायनिक खतांचा भडिमार थांबला आणि उत्तम, सकस पिकांचं उत्पादन वाढलं.



आशापूर गावात लोकसहभागातून ब्रिटिशकालीन पाटाचे पुनरुज्जीवन झाले.

### औंढेवाडी पाणी योजना

**औंढेवाडी हे गाव डोंगराच्या कुशीत आहे. तिथं पाऊस भरपूर पडतो. पण पाणी डोंगरावरून वाहून जातं. त्यामुळं पावसाळा संपला की पाणीटंचाई सुरू होते. त्यामुळं युवामित्रनं डोंगरात शोधमोहीम घेतली. ठिबकणाऱ्या पाण्याचं ठिकाण शोधून तिथं मोठा हौद केला. त्याचं पाणी पाइपलाइननं खाली गावात आणलं आणि बारा महिने भरपूर पाणी गावकऱ्यांना उपलब्ध करून दिलं. त्यासाठी त्याच गावातील शेतकऱ्यांचं श्रमदान घेण्यात आलं. दीड लाख रुपयांत झालेल्या या योजनेमुळं औंढेवाडी आजही खुशहाल आहे. कोट्यवधीची जलस्वराज्य योजना राबवून सरकारला जे शक्य झालं नाही, ते गावकऱ्यांनी लाखमोलात करून दाखवलं.**

### युवामित्रचे उपक्रम

युवामित्रने लोणारवाडी अ पंचक्रोशीत अनेक उपक्रम राबि आहेत. त्यात शिवारफेरी, निसर्गमि आरोग्यमित्र, कृषकमित्र, प्र सहशिक्षणाचा, दूध डेअरींचा समा आहे.

**(सीएसइ फेलोशिपअंत केलेले लिखाण)**